# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना :-</u>** **<u>मंजूर विकास योजना (सुधारीत)- नागपूर</u>.**

**{नगर रचना विभाग}** मौजा- सिताबर्डी रेल्वे स्टेशन लगत नागपूर - रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ विद्यमान २४.०० मी रूंद विकास रस्ता २५.०० मी. रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधेच्या विकासाकरीता भूसंपादन प्रकरणी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानातंर्गत शासनास निधी मागणीचा प्रस्ताव सादर करणेबाबत.

नागपूर शहरातील मौजा-सिताबर्डी येथील नागपूर - रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ रेल्वे स्टेशन लगत जयस्तंभ चौक ते मानस चौकापर्यंत विकास योजनेतील २४.०० मी रूंदीचा विकास योजना रस्त्याचे २५.०० मी रूंद करणेसह तद्नुषंगीक सुविधेचा विकास करणेचा प्रस्ताव असून सदर रस्ता राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ असून सदर रस्ता शहरातील मुख्य विकास योजना रस्ता आहे. सदर रस्ता रूंदीकरणामध्ये एकूण १२ शासकीय जागेचा समावेश असून २ जागा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (MSRTC) व मध्यप्रदेश राज्य परिवहन महामंडळ (MPRTC) यांच्या मालकीच्या आहेत. नगर भुमापन क्र. २४०३ ही जागा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या मालकीची असून सदर जागेचे क्षेत्र ४७६३.०० चौ.मी आहे. तसेच नगर भुमापन क्र. २४०४ नझुल/ मध्यप्रदेश राज्य परिवहन महामंडळ यांच्या मालकीची असून सदर जागेचे क्षेत्र २७४०.२० चौ.मी आहे. सदर दोन्ही जागांचे संपादनाखालील क्षेत्र ७५०३.२० चौ.मी. एवढे आहे. सदर जागेचे संपादन नागपूर महानगरपालिकेस करावयाचे असल्याने सदर जागेचे संपादनकामी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून सुधारीत मुल्यनिर्धारण अपेक्षिले असता उक्त मालमत्ताच्या संपादनाकरीता नभुक्र.२४०३ या जागेचे मुल्यांकन रू. १९,४२,६४,७१६/- तसेच नभुक्र. २४०४ या जागेचे मुल्यांकन रू. ११,९०,७९,७२२/- असून दोन्ही जागांचे एकूण मुल्यांकन रू. ३१,३३,४४,४३८/- एवढे सुधारीत मुल्यनिर्धारण उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी नागपूर (शहर) यांनी नागपूर महानगरपालिकेस दि ३०.०१.२०२४ रोजी कळविलेले आहे. रेल्वे स्टेशनजवळील उड्डाणपुलाखालील विस्थापित होत असलेल्या गाळेधारकांनी मा. उच्च न्यायालयात रिटयाचिका क्र. ५६३३/२०२२ दाखल केली असता त्यामधील दि. १३.१२.२०२३ रोजी पारीत आदेशानूसार सदर विकास योजनेतील रस्ता रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधेच्या विकासाकरीता उक्त मालमत्ताच्या संपादनासाठी आवश्यक निधी मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्णजंयती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत शासन नगर विकास विभागास सादर करणेबाबत आदेशित केलेले आहे. शासनाकडील निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/ प्र.क्र. ६१७ /नवि-३३, दि. ०४.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार केंन्द्र शासनाच्या केंद्रीय भूपृष्ठ वाहतुक मंत्रालय अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी असलेल्या रस्त्याच्या बांधकामाकरीता भूसंपादनासाठी आवश्यक असलेल्या एकूण निधीपैकी ७०% हिस्सा शासन स्तरावरून व उर्वरीत ३०% हिस्सा महानगरपालिका स्तरावरून खर्च करणे आवश्यक आहे. उक्त शासन निर्णयानूसार व मा. उच्च न्यायालयाचे

दि. १३.१२.२०२३ रोजी पारित आदेशाच्या अनुषंगाने उक्त रस्ता रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधा विकासातंर्गत बांधीत जागा संपादनाकरीता लागणा-या एकूण खर्चापैकी महानगरपालिकेच्या ३०% हिस्स्याची तरतुद महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे.

मौजा- सिताबर्डी, रेल्वे स्टेशन लगत नागपूर- रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ विद्यमान २४.०० मी. रूंद विकास योजना रस्ता २५.०० मी. रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधा विकासाकरीता भूसंपादनास्तव सुमारे रू. ३१,३३,४४,४३८/- खर्च अपेक्षित असल्याने त्यापैकी महानगरपालिकेचा ३०% हिस्सा खर्च करणेस हमी देणेबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेचा विषय विचारात घेणे.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे)

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 42/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 07/02/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार **मंजूर विकास योजना (सुधारीत)- नागपूर**. मौजा- सिताबर्डी रेल्वे स्टेशन लगत नागपूर - रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ विद्यमान २४.०० मी रूंद विकास रस्ता २५.०० मी. रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधेच्या विकासाकरीता भूसंपादन प्रकरणी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानातंर्गत शासनास निधी मागणीचा प्रस्ताव सादर करणेबाबत.

नागपूर शहरातील मौजा-सिताबर्डी येथील नागपूर - रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ रेल्वे स्टेशन लगत जयस्तंभ चौक ते मानस चौकापर्यंत विकास योजनेतील २४.०० मी रूंदीचा विकास योजना रस्त्याचे २५.०० मी रूंद करणेसह तद्नुषंगीक सुविधेचा विकास करणेचा प्रस्ताव असून सदर रस्ता राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ असून सदर रस्ता शहरातील मुख्य विकास योजना रस्ता आहे. सदर रस्ता रूंदीकरणामध्ये एकूण १२ शासकीय जागेचा समावेश असून २ जागा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (MSRTC) व मध्यप्रदेश राज्य परिवहन महामंडळ (MPRTC) यांच्या मालकीच्या आहेत. नगर भुमापन क्र. २४०३ ही जागा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या मालकीची असून सदर जागेचे क्षेत्र ४७६३.०० चौ.मी आहे. तसेच नगर भुमापन क्र. २४०४ नझुल/ मध्यप्रदेश राज्य परिवहन महामंडळ यांच्या मालकीची असून सदर जागेचे क्षेत्र २७४०.२० चौ.मी आहे. सदर दोन्ही जागांचे संपादनाखालील क्षेत्र ७५०३.२० चौ.मी. एवढे आहे. सदर जागेचे संपादन नागपूर महानगरपालिकेस करावयाचे असल्याने सदर जागेचे संपादनकामी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून सुधारीत मुल्यनिर्धारण अपेक्षिले असता उक्त मालमत्ताच्या संपादनाकरीता नभुक्र.२४०३ या जागेचे मुल्यांकन

रू. १९,४२,६४,७१६/- तसेच नभुक्र. २४०४ या जागेचे मुल्यांकन रू. ११,९०,७९,७२२/- असून दोन्ही जागांचे एकूण मुल्यांकन रू. ३१,३३,४४,४३८/- एवढे सुधारीत मुल्यनिर्धारण उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी नागपूर (शहर) यांनी नागपूर महानगरपालिकेस दि ३०.०१.२०२४ रोजी कळविलेले आहे. रेल्वे स्टेशनजवळील उड्डाणपुलाखालील विस्थापित होत असलेल्या गाळेधारकांनी मा. उच्च न्यायालयात रिटयाचिका क्र. ५६३३/२०२२ दाखल केली असता त्यामधील दि. १३.१२.२०२३ रोजी पारीत आदेशानूसार सदर विकास योजनेतील रस्ता रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधेच्या विकासाकरीता उक्त मालमत्ताच्या संपादनासाठी आवश्यक निधी मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्णजंयती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत शासन नगर विकास विभागास सादर करणेबाबत आदेशित केलेले आहे. शासनाकडील निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/ प्र.क्र. ६१७ /नवि-३३, दि. ०४.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानूसार केंन्द्र शासनाच्या केंद्रीय भूपृष्ठ वाहतुक मंत्रालय अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी असलेल्या रस्त्याच्या बांधकामाकरीता भूसंपादनासाठी आवश्यक असलेल्या एकूण निधीपैकी ७०% हिस्सा शासन स्तरावरून व उर्वरीत ३०% हिस्सा महानगरपालिका स्तरावरून खर्च करणे आवश्यक आहे. उक्त शासन निर्णयानूसार व मा. उच्च न्यायालयाचे दि. १३.१२.२०२३ रोजी पारित आदेशाच्या अनुषंगाने उक्त रस्ता रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधा विकासातंर्गत बांधीत जागा संपादनाकरीता लागणा-या एकूण खर्चापैकी महानगरपालिकेच्या ३०% हिस्स्याची तरतुद महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे.

मौजा- सिताबर्डी, रेल्वे स्टेशन लगत नागपूर- रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ विद्यमान २४.०० मी. रूंद विकास योजना रस्ता २५.०० मी. रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधा विकासाकरीता भूसंपादनास्तव सुमारे रू. ३१,३३,४४,४३८/- खर्च अपेक्षित असल्याने त्यापैकी महानगरपालिकेचा ३०% हिस्सा खर्च करणेस हमी देणेबाबतच्या प्रस्तावास  मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.